वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन व प्रशिक्षण संस्था
व्हीआयपी रोड, धरमपेठ, नागपूर ४४० ०१०
E Mail – info@vanamati.gov.in Phone- 0712 2555999, 2541944

क्रं : वनामती/आस्था/से.नि./वास्तुवि./नामिकासूची/2025/ ६६ दिनांक 06/01/2025

# जाहिरात

## (तिसरी वेळ)

( वनामती अंतर्गत विवक्षित कामासाठी नामिकासूची करणेबाबत)

वनामती आणि अधिनस्थ राज्यभरातील सात रामेती संस्थेचे परिसरातील इमारतींचे बांधकाम/दुरुस्ती/देखभाल व व्यवस्थापन या विवक्षित कामासाठी वास्तुविशारद यांची नामिकासूची तयार करावयाची आहे. त्यासाठी महाराष्ट्र शासनाचे नगररचना विभाग, महानगरपालिका, जिल्हा परिषद, स्वायत्त संस्था, सार्वजनिक बांधकाम विभाग इ. विभागातील वर्ग –1 व 2 सेवेतून सेवानिवृत्त झालेले अधिकारी/खाजगी वास्तुरचनाकार यांच्याकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

1. नामिकासूचि मधील वास्तुविशारद यांचे विवक्षित कामासाठी नियुक्तीच्या कालावधीत कर्तव्ये व जबाबदा–या पुढीलप्रमाणे राहतील.

   1. वनामती आणि अधिनस्थ सर्व रामेती संस्थेचे परिसरातील इमारतींचे बांधकाम/दुरुस्ती/देखभाल व व्यवस्थापन संबधी सर्व कामे
   2. आवश्यकतेनुसार वनामती अंतर्गत महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीका व बांधकाम/दुरुस्ती व परिरक्षण संबधी सर्व प्रचलित नियमासंबधी आवश्यकतेनुसार प्रशिक्षण देणे
   3. वरीष्ठ अधिका–यांच्या निर्देशानुसार वनामती/रामेती बांधकाम दुरुस्ती व्यवस्थापनासंबधी सल्ला व कामे

**2.** नामिकासूचीसाठीवरील नमूद सर्व विभागातील वास्तुविशारद पदांवरुन सेवानिवृत्त झालेले गट–अ व गट–ब पदावरील अधिकारी असावा अथवा खाजगी वास्तुरचनाकार (शासकीय कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

**3. उपरोक्त तरतूदीसोबत पुढील अटी व शर्तीही लागू राहतील.**

1. नामिकासूची मध्ये नावे समाविष्ट असलेल्या उमेदवारा पैकी संस्थेच्या निकडीनुसार प्रथमतः जास्तीत जास्त 11 महिन्याच्या कालावधीसाठी किंवा विवक्षित काम संपेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीसाठी नियुक्त करण्यात येईल. सामान्य प्रशासन विभागशासन निर्णय दिनांक 17.12.2016 नुसार नामिकासूचीची वैधता 3 वर्षे असून विवक्षित काम सुरु राहिल्यास संस्थेच्या निकडीनुसार पुनश्च मुदतवाढ देण्यात येईल.

2. सक्षम प्राधिकारी यांना कोणत्याही वेळी अशा वास्तुरचनाकार यांच्या नियुक्ती आणि सेवा समाप्ती बाबतचे अधिकार राहतील.

3. शासकीय सेवानिवृत्त अधिकारी यांचे करिता शासन निर्णय दिनांक 17.12.2016 नुसार अर्ज करतेवेळी उमेदवाराचे वय 65 वर्षाचे आत असावे.

4. विवक्षित कामासाठी अर्ज करणारा उमेदवार शारिरिक व मानसिक आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा तसेच विवक्षित कामाकरिता त्यांचेकडे आवश्यक क्षमता असावी.

5. विवक्षित कामासाठी नियुक्ती असल्याने संबधीतास नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क असणार नाही.

6. विवक्षित कामासाठी नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी

7. विवक्षित कामासाठी नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबध (Conflict of Interest) जाहिर करणे आवश्यक राहील. कामासाठीचे वास्तुरचनाकार शुल्क सोबत जोडलेल्या प्रपत्रातील Annexure-V नुसार सादर करावे.

8. इच्छूक उमेदवारांनी साध्या (ए4 साईज) कागदावर सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात अर्ज करावा.

9. अर्जाचे लिफाफयावर **वनामती आणि अधिनस्थ सर्व रामेती संस्थेचे परिसरातील इमारतींचे बांधकाम/दुरूस्ती/देखभाल व व्यवस्थापन या विवक्षित कामासाठी नामिकासूची मध्ये नावे समाविष्ट करणेबाबत अर्ज** असे ठळक अक्षरात नमूद करावे. तसेच आवश्यक असलेले सर्व कागदपत्रे अर्जासोबत जोडावे.

10. अर्ज सादर करण्याचा अंतीम दिनांक 15.....01.2025 असून सदर दिवशी संध्याकाळी 6.00 वाजेपर्यंत अर्ज स्विकारण्यात येतील त्यानंतर आलेले अर्ज विचारात घेतल्या जाणार नाही. पोस्टाने अर्ज पाठविल्यास झालेल्या विलंबास वनामती कार्यालय जबाबदार राहणार नाही.

11. प्राप्त अर्जाचे अनुषंगाने निवडीबाबत कार्यवाही करण्याचे संपुर्ण अधिकार वनामती संस्थेस असून अर्ज नाकारला गेल्यास याबाबतचे कोणतेही स्पष्टीकरण/लेखी सूचना देण्यास संस्था बांधील राहणार नाही.

दिनांक 6.....01.2025

6/1/25

(रविन्द्र ठाकरे) भाप्रसे

संचालक

वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार

व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर

# अर्जाचा नमुना

**सेवानिवृत्त गट अ/गट ब तसेच खाजगी वास्तुविशारदयांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरिता नामिकासूची मध्ये नाम समाविष्ट करणेबाबत अर्ज**

पासपोर्ट साईज
फोटो

1. अर्जदाराचे संपूर्ण नाव : ------------------------------

2. निवासी पत्ता : ------------------------------
------------------------------
------------------------------

3. भ्रमणध्वनी क्रमांक :

4. विभागास आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय : होय/नाही

5. जन्मदिनांक व वय :

6. शासकीय सेवेतून सेवानिवृत्त असल्यास पदनाम : ------------------

7. एकूण सेवा कालावधी : वर्ष ...... महीने.........

8. सेवानिवृत्तीचे दिवशीचे शेवटचे मासिक वेतन :

9. आपण नमूद करू इच्छीत असल्यास सदर पदासाठी लाभदायक ठरेल अशी आपणाशी संबधीत इतर माहीती किंवा विवरण/अनुभव

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

विवक्षित प्रकारचे कामकाज पार पाडण्यासाठी करार पध्दतीने नियुक्तीने जाहिरात / सूचना मी काळजीपुर्वक वाचली असून सदर सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

दिनांक :

सहपत्र :

अर्जदाराची स्वाक्षरी